# प्रबोधन
## गोरेगाव

## ३५ वा वार्षिक अहवाल
## २००६ - २००७



# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४.
दूरध्वनी क्र. २८७९ ७५८०/२८७९ ७५८१.
www.prabodhan.org

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदवलेली संस्था (Regn.No.Mum.46/72 GB BSD)
मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदवलेली संस्था
(Regn.No.F 2502 Mum.)
आयकर कलम ८०-ग खाली देणग्या करमुक्त

## पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

२००६-२००७

अध्यक्ष : **डॉ. मनोहर अद्वानकर** एम्.एस्सी, पीएच्.डी.
उपाध्यक्ष : **ॲड्. विकास रेळे** बी.ए., एल्.एल्.बी.
**श्री. श्रीनिवास शिरसेकर** जी.डी.आर्टस्

## कार्यकारी मंडळ

कार्याध्यक्ष : **श्री. मिलिंद डुंबरे** बी.कॉम.
प्रमुख कार्यवाह : **श्री. अनिल देसाई**
सहकार्यवाह : **श्री. भूषण काळे**
**श्री. रमेश इस्वलकर**
खजिनदार : **श्री. नितिन शिंदे** बी.ए., डी.जे.

## सभासद

**श्री. चंद्रकांत देऊलकर**
**श्री. प्रसाद भायदे**
**श्री. अरविंद सावंत**
**श्री. शशांक कामत** बी.कॉम.
**श्री. समीर त्रैलोक्य**
**श्री. विनोद निंबाळकर**
**श्री. गोविंद येतयेकर** बी.कॉम.
**श्री. प्रफुल्ल धामणकर**
**श्री. चाक्को मॅथ्यू**
**श्री. सुनिल कविश्वर**

## सल्लागार समिती

**श्री. वसंत तावडे** **श्री. विलास देवरूखकर** **श्री. गिरीश देसाई**
**श्री. पांडुरंग पोखरकर** **श्री. सुरेश चव्हाण** **श्री. महादेव खानोलकर**

अंतर्गत हिशेबतपासनीस
**श्री. विवेक जोशी** बी.कॉम., एफ.सी.ए.

सनदी लेखापाल
**श्री. जयंत आपटे** बी.कॉम., एफ.सी.ए.

# प्रबोधन गोरेगाव

## ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची ३५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि. ३१ डिसेंबर २००७ रोजी रात्रौ ८.०० वा. प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेपुढील कामकाज :

१. प्रास्ताविक
२. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजुरी देणे.
३. २००६-२००७ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद हिशेबतपासनीसांच्या अहवालासह वाचून मंजूर करणे.
४. नवीन वर्षाकरिता २००७-२००८ घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा), उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा).
५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेबतपासनीस व सरकारमान्य हिशेबतपासनीस यांची नेमणूक करणे.
६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळ
प्रबोधन गोरेगाव

दि. १५ डिसेंबर २००७
गोरेगाव, मुंबई.

---

१. संस्थेचा जमाखर्च प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४ येथील संस्थेच्या कार्यालयात दि. २१ ते २२ डिसेंबर २००७ पर्यंत संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. कोणत्याही सभासदास त्याबाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दि. २७ डिसेंबर २००७ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.
२. गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहाणार नाही.
३. निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. २४ डिसेंबर २००७ पर्यंत संस्था कार्यालयात संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना सोबत दिला आहे.

## प्रबोधन गोरेगाव

कार्यकारिणीवरील सदस्य निवडणुकीची सूचना

१. निवडणुकीसाठी उभा राहाणारा उमेदवार, सूचक व अनुमोदक घटनेनुसार पात्र असले पाहिजेत.

२. खालील विहीत अर्जाच्या नमुन्यानुसार लेखी अर्ज दि. २४ डिसेंबर २००७ पूर्वी कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.

३. निवडून द्यावयाच्या जागांइतके किंवा कमी उमेदवार असतील तर त्यांची निवड बिनविरोध झाल्याचे जाहीर करण्यात येईल व उरलेल्या जागांसाठी सभेस उपस्थित असलेल्या सभासदांमधून आवश्यक ठरल्यास उर्वरित जागांसाठी निवड करण्यात येईल.

४. निवृत्त होणारे सभासद निवडणुकीस उभे राहू शकतील.

५. उमेदवारास आपले नाव मागे घेण्याची अंतिम मुदत दि. २७ डिसेंबर २००७ पर्यंत कार्यालयीन वेळेत राहील.

६. उमेदवाराने निवडणुकीच्या वेळी सभेस उपस्थितीत राहाणे आवश्यक आहे.

---

### उमेदवारी अर्जाचा नमुना

(अर्ज स्वतंत्र कागदावर लिहिणे)

प्रमुख कार्यवाह

प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन गोरेगावच्या २००७-२००८च्या अध्यक्षपदासाठी / उपाध्यक्षपदासाठी / कार्यकारिणी सदस्यत्वासाठी मी श्री./सौ./कु. ______________________ अर्ज करीत आहे.

सूचक सभासदाचे नाव श्री./सौ./कु. ______________ स्वाक्षरी :

सभासद क्र :

वरील सूचनेस माझे अनुमोदन आहे.

अनुमोदक सभासदाचे नाव श्री./सौ./कु. ______________ स्वाक्षरी :

सभासद क्र. :

वरील सूचनेस माझी संमती आहे.

उमेदवार सभासदाचे नाव श्री./सौ./कु. ______________ स्वाक्षरी :

पत्ता : ______________________________

______________________________

सभासद क्रमांक :

# प्रबोधन गोरेगाव

## ३५ वा वार्षिक अहवाल

(१ एप्रिल २००६ ते ३१ मार्च २००७)

**प्रबोधन गोरेगाव** या संस्थेच्या ३५ व्या वर्षाचा अहवाल संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांना सादर करताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे. या अहवाल वर्षात संस्थेच्या कार्यकारिणीच्या एकूण ९ सभा झाल्या. या सभांना समाधानकारक उपस्थिती होती. अहवाल वर्षअखेर प्रबोधन गोरेगावचे ७ आश्रयदाते, ४१९ आजीव सभासद तसेच प्रबोधन क्रीडाभवनाचे ४८५ दीर्घ मुदतीचे सभासद आहेत.

३ ५ वर्षापुर्वी कला, क्रीडा, ज्ञान व समाजसेवा या सुत्रांचा स्वीकार करीत **'प्रबोधन गोरेगाव'** संस्थेची स्थापना झाली. क्रीडाक्षेत्राचा विकास करताना होतकरु क्रीडापटु तयार करणे हे एकमेव उददीष्ट डोळयासमोर ठेवुन **'प्रबोधन गोरेगाव'**ची ३ ५ वर्षांची वाटचाल अविरत सुरु आहे. आपल्या आागळया वेगळया उपक्रमानी प्रबोधन संस्था केवळ पश्चिम उपनगरातच नव्हे तर महाराष्ट्रात आपले नाव उज्ज्वल करीत आहे. हे अभिमानाने सांगावेसे वाटते. भविष्यातही हाच ध्यास कायम ठेवत प्रबोधनने आपली वाटचाल आधिक यशस्वी करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

गेल्या ३ ५ वर्षात प्रबोधनने प्रत्येक क्षेत्रात यशस्वी वाटचाल करताना भारतीय शास्त्रीय संगीताची नवी ओळख निर्माण करुन देणारा 'मुंबई फेस्टिव्हल' हा कार्यक्रम तसेच औषधी वनस्पती जनसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी 'हर्बल वर्ल्डचे' भव्य प्रदर्शन आयोजीत करीत वैद्यकीय क्षेत्रात आपली नवीन ओळख करुन दिली. स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनकार्याची ओळख व त्यांच्या त्यागाचा महिमा नव्या पिढीला करुन देंण्यासाठी 'प्रबोधन गोरेगाव' व 'सावरकर उत्सव' समिती यांच्या विद्यमाने सावरकर उत्सव आयोजित करण्यात आला.

आज संस्थेचे स्वर्गीय माँ साहेब मीनाताई ठाकरे रक्तपेढी, ओझोन ॲक्टीव्हीटी सेंटर, जॉगर्स पार्क, प्रबोधनकार ठाकरे वाचनालय यासारखे अनेक उपक्रम यशस्वीरित्या सुरु असून पश्चिम उपनगरवासीयांना या सुविधांचा सातत्याने लाभ होत आहे.

संस्थेचा हा प्रवास गेली ३ ५वर्षे अविरतपणे सुरु आहे, यासाठी नव्या दमाची, नव्या विचारांची, नव्या उमेदिची मंडळीही सोबत जोडावयाची आहेत. या मंडळींना एकत्र घेऊन संस्थेला उच्च शिखराकडे न्यावयाचा आमचा मानस आहे.

संस्थेच्या या उपक्रमात आर्थिक पाठबळ उपलब्ध करुन देणारे देणगीदार, शासकीय, निम शासकीय, सेवाभावी संस्था व अनुदान देणा-या संस्थांचा उपक्रमास लाभलेल्या सहकार्याबददल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. स्थानिक जनतेचे सहकार्य, निष्ठावान व सेवाभावी कार्यकर्त्यांचे पाठबळ आणि ज्येष्ठ सदस्यांचे आशीर्वाद व सहकार्य या जोरावरच आम्ही हा पल्ला यशस्वी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहोत.

प्रबोधन गोरेगाव संस्थेच्या ३ ५व्या वर्षातील कार्याचा इतिवृत्तांत, ताळेबंद व जमाखर्च पत्रके आम्ही सन्माननीय सभासदांच्या माहीतीसाठी सादर करीत आहोत.

कळावे,

लोभ आहेच, तो अधिक वृद्धींगत व्हावा, अशी नम्र विनंती आहे.

**कार्यकारी मंडळ,**
**प्रबोधन गोरेगाव**

## एस्.एस्.सी. व्याख्यानमाला

सृजनशील बुद्धीला अनिर्बंध संचार करावयाला शिक्षण क्षेत्रात अनंत संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना घडविण्याचे सामर्थ्य तसेच गगनाला गवसणी घालण्याचा ध्येयवाद निर्माण करण्याचीही शक्ती फक्त शिक्षकातच असते. आजच्या संगणकीय युगात नेमक्या वेळात, नेमक्या पद्धतीने, नेमके लिहीले तरच विद्यार्थ्यांना शालान्त परीक्षेच्या गुणस्पर्धेत यशस्वी होण्यास मदत होईल. वर्षभराचा अभ्यास दोन ते तीन तासात शिकविणे हे काम शिक्षकच करू शकतात.

व्याख्यानमालेचे मार्गदर्शक शिक्षक, प्रबोधन संस्थेच्या प्रेमापोटी मुलांना मार्गदर्शन करण्याचे काम अतिशय आवडीने व उत्साहाने करतात. सदर व्याख्यानमाला आयोजित करण्यासाठी अरविंद गंडभीर विद्यालयाचे शिक्षक *श्री. एकनाथ कुंभार* यांचे मोलाचे सहकार्य गेली अनेक वर्षे लाभत आहे.

व्याख्यानमालेचे हे ३५ वे वर्ष असून ही व्याख्यानमाला दि. ३ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी २००७ या कालावधीत प्रबोधन जॉगर्स पार्क येथे आयोजित करण्यात आली.

## प्रबोधन बालवाडी

समाजाच्या अविकसित घटकांना उपयुक्त ठरणारे उपक्रम प्रबोधन यथाशक्ति आयोजित करीत असते. त्यापैकी एक उपक्रम म्हणजे प्रबोधन संस्थेतर्फे माफक शुल्कात जवाहर नगर, गोरेगाव (प.) व कोयना वसाहत, गोरेगाव (पू.) येथील झोपडपट्टीत बालवाड्या चालविण्यात येतात. या बालवाडीत जवळपास १०० बालकांना पूर्व प्राथमिक स्वरूपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. *श्रीमती शालिनी वारीसे* यांचे या कार्यात मोलाचे सहकार्य सातत्याने लाभत आहे. या उपक्रमासाठी गेली अनेक वर्ष *सारस्वत बँकेचे* आर्थिक सहकार्य मिळत आहे. या मोलाच्या सहकार्याबद्दल संस्था बँकेची ऋणी आहे.

## प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिन

प्रबोधन गोरेगाव संस्थेने यंदाही प्रबोधन क्रीडाभवनात हे दोन्ही महत्त्वाचे राष्ट्रीय सण साजरे केले. वरील या दोन्ही दिवशी प्रबोधन गोरेगावच्या प्रांगणात ध्वजवंदन करण्यात आले.

## ३५ वा वर्धापन दिन

संस्थेचा ३५ वा वर्धापनदिन सोहळा प्रबोधन क्रीडाभवन येथे गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला शनिवार दि. १७ मार्च २००७ रोजी शानदारपणे संपन्न झाला. त्याप्रसंगी सुप्रसिद्ध संगीतकार सुधीर फडके आणि श्रीधर फडके यांनी स्वरबद्ध केलेली व गायलेली गीते यांचा फिटे अंधाराचे जाळे हा लोकप्रिय मराठी गीतांचा कार्यक्रम नामवंत संगीतकार श्रीधर फडके यांनी सादर केला. त्याप्रसंगी सन्माननीय सभासद व हितचिंतक आवर्जून उपस्थित होते. प्रथेप्रमाणे गोरेगावातील विद्यार्थ्यांचा व संस्थेच्या क्रीडाक्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा यथायोग्य सन्मान करण्यात आला. या प्रसंगी प्रबोधनच्या ३५ वर्षांची वाटचाल दर्शविणारी स्मरणिका प्रकाशित करण्यात आली.

## प्रबोधन आंतरशालेय क्रीडामहोत्सव

पश्चिम उपनगरातील शालेय क्रीडा जीवनातील महत्त्वाचा असा प्रबोधन क्रीडामहोत्सव ज्याची शालेय खेळाडू डिसेंबर महिना जसजसा जवळ येत जातो तेव्हा आतुरतेने वाट पाहतात. असा हा क्रीडामहोत्सव दि. ६ ते १० डिसेंबर, २००६ या दरम्यान प्रबोधन क्रीडाभवन येथे आयोजित करण्यात आला. यात १४० शाळांतील ६००० विद्यार्थी सहभागी झाले होते.

२९ व्या प्रबोधन आंतर-शालेय क्रीडामहोत्सवाचा उद्घाटन सोहळा दि. ६ डिसेंबर, २००६ रोजी सकाळी ८.०० वाजता पार पाडला. याप्रसंगी प्रबोधन संस्थेच्या प्रेमापोटी संस्थेचे हितचिंतक व अनेक मान्यवर उपस्थितीत होते. त्यांनी उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात संस्था अनेक क्षेत्रात करीत असलेल्या कार्याबद्दल खास करून क्रीडाक्षेत्रासाठी करीत असलेल्या योगदानाबद्दल गौरवोद्‌गार काढले.

क्रीडामहोत्सवाच्या समारोपापूर्वी झालेली लोकनृत्य स्पर्धा विशेष बहारदार झाली. सुमारे ३००० प्रेक्षकांच्या साक्षीने झालेल्या यास्पर्धेत विविध प्रकारची लोकनृत्ये शालेय विद्यार्थ्यांनी अत्यंत बहारदारपणे सादर केली.

सदर क्रीडामहोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण समारंभ रविवार दि. १० डिसेंबर, २००६ रोजी प्रबोधनचे अध्यक्ष डॉ. मनोहर अद्वानकर व विशेष अतिथी म्हणून श्री. रामाराव (प्रशिक्षक, टेनिस ॲकॅडमी प्रबोधन) यांच्या हस्ते अत्यंत उत्साही व शिस्तबद्ध वातावरणात पार पाडला. यावेळी विजेत्या संघांना फिरते स्मृतिचिन्ह व कायम स्वरूपी स्मृतिचिन्ह तसेच प्रशस्तीपत्रक

देऊन गौरविण्यात आले. क्रीडामहोत्सवातील सर्वोकृष्ट संघासाठी असणारा कै. वासुदेव कृष्णाजी सैतवडेकर, फिरते प्रबोधन मानचिन्ह महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व) यांनी पटकाविले.

आयडियल क्लासेस, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, ग्रेटर बँक, देना बँक, कोको कोला, सारस्वत बँक यांनी सदर क्रीडामहोत्सव पुरस्कृत केला. या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे.

(सविस्तर निकाल परिशिष्ट अ मध्ये पाहावा)

## उन्हाळी प्रशिक्षण शिबिर

प्रबोधन क्रीडाभवनच्या सर्व सुविधा १९९२ पासून सुरू झाल्या पासून मुंबईतील क्रीडा क्षेत्रातील तज्ज्ञ प्रशिक्षक नियमित वर्गास प्रशिक्षण देऊ लागले. नियमित प्रशिक्षण वर्गाला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन तसेच सुसज्ज व समतोल अशा क्रीडांगणाचा व क्रीडाभवनातील सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करण्याच्या विचाराने संस्थेने उन्हाळी सुट्टीमध्ये वेगवेगळया कला व क्रीडा प्रकारांची शिबिरे भरविण्यास सुरूवात केली.

यंदाच्या १३ व्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिरात क्रिकेट, मल्लखांब, कराटे, ॲथलेटिक्स, बालयोग व चित्रकला अशा विविध कला, क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. यावर्षी हे शिबिर दि. १६ एप्रिल २००६ ते ३१ मे २००६ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

गेल्या तीन वर्षांपासून उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा एक भाग म्हणून ८ ते १४ वयोगटातील मुलां-मुलींसाठी विनामूल्य बाल-योग प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी १३० विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले. त्यांना योग शिक्षिका *श्रीमती नीलिमा रेडकर* व *श्रीमती अंजली बुरांडे* यांचे मार्गदर्शन लाभले.

शिबिरातील सर्व कला, क्रीडा प्रकारात एकूण १३०० विद्यार्थी सहभागी झाले होते. क्रिकेट प्रशिक्षणाचे उद्‌घाटन माजी क्रिकेटपटू व मुंबई क्रिकेट संघटनेचे उपखजिनदार श्री. रवि सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. सर्व सहभागी शिबिरातील प्रशिक्षणार्थींना संस्थेतर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली. शिबिराच्या समारोपाच्या दिवशी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची प्रात्यक्षिके उपस्थितांना करून दाखविली. समारोप सोहळयात प्रबोधन संस्थेच्या मल्लखांब, खो-खो व ॲथलेटिक्स या क्षेत्रातील वर्षभरात चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना कै. भाऊ वराडकर स्मरणार्थ असलेल्या पारितोषिकांचे वितरण सिनियर क्रिकेटर्स सी.सी. संस्थेच्या प्रतिनिधींच्या हस्ते करण्यात आले.

## प्रोजेक्ट - २०००

प्रोजेक्ट २००० या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत एकूण ५ खेळाडूंना *श्री. रवि बागडी* यांच्या तज्ज्ञ मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण देण्यात येते. या सर्व खेळाडूंना संस्थेतर्फे अल्पोपहार, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, खेळासाठी लागणारे साहित्य, सरावासाठी व स्पर्धेसाठी होणारा प्रवास खर्च या सर्व सोयी संस्थेतर्फे देण्यात येतात. या प्रकल्पांतर्गातील खेळाडूंनी विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला व आपल्या खेळाची चमक दाखविली.

## ॲथलेटिक्स

'मुंबई उपनगर ॲथलेटिक्स संघटने' शी संलग्नता स्विकारून संस्थेने क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून 'ॲथलेटिक्स' चे प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. ॲथलेटिक्स या क्रीडाप्रकारात प्रबोधन क्रीडाभवन, गोरेगाव तसेच पश्चिम उपनगरातील एकूण २० ते ३० खेळाडू *श्री. रवि बागडी* यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेतात. संस्थेच्या खेळांडूनी गेल्या वर्षभरात झालेल्या जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होताना उल्लेखनीय कामगिरी केली.

## कराटे

प्रबोधन क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून गोरेगाव परिसरातील मुला-मुलींना संरक्षण, चपळता यासाठी उपयुक्त अशा क्रीडाप्रकाराचा लाभ घेता यावा, यासाठी संस्थेने 'जपान कराटे असोसिएशन' शी संलग्न होऊन कराटेचे प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. *श्री. सिताराम चव्हाण* या प्रशिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली तयार होत असलेल्या कराटेपटूंनी स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करताना अनेक पारितोषिकेही जिंकली आहेत. या स्पर्धेमध्ये प्रबोधन गोरेगावच्या कराटे वर्गातील विद्यार्थीनी कु. दिव्या रेवणकर व कराटे प्रशिक्षक श्री. सिताराम चव्हाण यांनी महाराष्ट्र कराटे असोसिएशनचे नेतृत्व केले. या स्पर्धेत कु. दिव्या रेवणकर हिने प्रथम क्रमांक पटकाविला.

१८ ते २१ वयोगट, ४८ ते ५३ किलो वजनामध्ये कु.दिव्या रेवणकर हिने प्रथम क्रमांक पटकाविला व कु. दिव्याची निवड मकाव येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेमध्ये भारताचे नेतृत्व करण्यासाठी झाली. कु.निनाद सावंत व कु.सौरभ माने हे ब्लॅक बेल्ट परिक्षेत उत्तीर्ण झाले. कु. दिव्या रेवणकर ही सेकंड डीग्री ब्लॅक बेल्ट परीक्षा उत्तीर्ण झाली. कु. दिव्या रेवणकर हिने श्रीलंकेमध्ये झालेल्या सॅफ गेम स्पर्धेमध्ये भारताचे नेतृत्व केले व तिसरा क्रमांक पटकाविला.

जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरीय स्पर्धेत प्रतिनिधित्व करताना प्रबोधनच्या खेळाडूंनी एकूण ९८ पदके पटाकाविली. प्रबोधनचे प्रशिक्षक *श्री. सिताराम चव्हाण* हे आंतरराष्ट्रीय ४ थी डीग्री ब्लॅक बेल्ट परीक्षा व त्याचबरोबर पंच व प्रशिक्षक परीक्षा पास झाले. प्रबोधन कराते वर्गातील मास्टर साहिल देसाई, मास्टर कौस्तुभ भोसले, मास्टर श्रेयश भिडे, कु. विशाल सुर्वे व प्रशिक्षक सिताराम चव्हाण यांनी ऑस्ट्रेलिया येथे होणाऱ्या १० व्या जागतिक कराते स्पर्धेत भारताचे नेतृत्व केले. भारताच्या १४ खेळाडूंपैकी पाच खेळाडू प्रबोधन वर्गातील होते. जागतिक कराते चॅम्पियनशिप कप यात ४४ देशाने भाग घेतला. यात सिताराम चव्हाण यांनी नोरने देशाच्या खेळाडूला हरवले.

## टेबल टेनिस

प्रबोधन क्रीडाभवनाच्या स्थापनेपासून सुरू असलेल्या **टेबल टेनिस** प्रशिक्षण वर्गात प्रशिक्षक *श्री. राजेश आंगणे* यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज साधारणतः २० विद्यार्थी प्रशिक्षण घेतात. प्रबोधन येथे प्रशिक्षण घेत असलेल्या *जितेश पवार* व *मोहित राठोड* या दोन्ही खेळाडूंनी आंतरशालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली.

## क्रिकेट

क्रिकेटचे प्रशिक्षण वर्षभर खेळाडूंना दिले जाते. या प्रशिक्षणाचा लाभ गोरेगाव तसेच पश्चिम उपनगरातील खेळाडू घेतात. दर वर्षी या खेळास वाढता प्रतिसाद लाभत आहे. सकाळ व दुपार या दोन वेळात प्रशिक्षण दिले जाते.

## खो-खो

मुंबई उपनगर जिल्हा खो-खो संघटनेच्या सहकार्याने संस्था खो-खो ह्या भारतीय खेळाच्या प्रसारासाठी गेली अनेक वर्षे कार्यरत आहे. भारतीय खेळांच्या प्रसारासाठी संस्था सदैव अग्रेसर राहिली आहे.

## मल्लखांब / जिमनॅस्टिक्स

शरीराच्या सर्व अवयवांना कमीत कमी वेळात संपूर्ण व्यायाम देणारा मल्लखांब/जिमनॅस्टिक्स हा क्रीडाप्रकार आहे. धैर्य, ताकद, लवचिकता, कस, प्रसरणशीलता, वेग, दमछाक, सांघिक खेळांमधील संघभावना व परस्परानुभव या सर्व प्रकारच्या खेळांत आवश्यक असलेल्या कुवतीमध्ये मल्लखांबच्या नियमित सरावाने लक्षणीय वाढ होते. 'मदर डिसिप्लिन' अथवा पायाभूत खेळ असेही यास संबोधले जाते. या खेळाच्या विकासासाठी व प्रसारासाठी संस्था गेली १३ वर्षे कार्यरत आहे.

## प्रबोधन गोरेगाव खालील संस्थाशी संलग्न आहे.

- मुंबई उपनगर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना
- मुंबई उपनगर खो-खो संघटना
- मुंबई क्रिकेट संघटना
- मुंबई जिल्हा टेबल टेनिस संघटना
- महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना
- बृहन्मुंबई ॲमॅच्युअर जलतरण संघटना
- मुंबई उपनगर कबड्डी संघटना
- मुंबई उपनगर जिल्हा मल्लखांब संघटना
- मुंबई जिल्हा जिम्नॅस्टिक संघटना
- जपान कराटे संघटना (भारत)
- नालंदा नृत्य संशोधन केंद्र

# प्रबोधन व्यासपीठ

प्रबोधन व्यासपीठ या उपक्रमांतर्गत गेल्या पाच वर्षात वेगवेगळया विषयांवर व्याख्याने आयोजित करताना संस्थेने सामाजिक कार्यातील आपले कर्तव्य पार पाडले, असे आम्हास वाटते. यावर्षी सुद्धा विविध क्षेत्रातील नामवंत, तज्ञ मंडळींनी आपले विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमांना रसिक श्रोत्यांची उपस्थिती नेहमीच उत्तम राहिली आहे. व्याख्याते व विषय यांची निवड करणे, तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लेखक व पत्रकार *श्री. शशी भालेकर* यांचे सातत्याने मौलिक सहकार्य लाभले आहे. अहवाल वर्षातील व्यासपीठाचा तपशिल खालीलप्रमाणे -

| दिनांक | वक्ते | विषय |
|---|---|---|
| १५ एप्रिल ०६ | श्री. प्रसाद कुलकर्णी | आनंदयात्रा |
| २० मे ०६ | डॉ. संजय अपरांती | अश्लिलता आणि मुंबई पोलिस |
| १७ जून ०६ | शिबानी जोशी आणि<br>श्रीराम केळकर (न्यूज रीडर,<br>(- दूरदर्शन, आकाशवाणी) | बित्तंबातमी |
| १५ जुलै ०६ | ॲड्. किशोर जावळे | केल्याने देशाटन |
| १९ ऑगस्ट ०६ | श्रीमती क्रांतीगीता महाबळ<br>(सुप्रसिध्द कीर्तनकार) | सुश्राव्यकीर्तन |
| १६ सप्टे. ०६ | प्रा. विसुभाऊ बापट | समरात रंगली कविता |
| २८ ऑक्टो. ०६ | श्री. प्रमोद नवलकर | असा मी, असे आम्ही! |
| २५ नोव्हें. ०६ | श्री. विजयराज बोधनकर<br>(सुप्रसिध्द स्वभावचित्रकार) | चित्रकला शापमुक्त होणारच! |
| २३ डिसें. ०६ | डॉ. वसंत यशवंत चव्हाण<br>(सुप्रसिध्द हृदयरोगतज्ञ) | अध्यात्म साधना |
| १७ जाने ०७ | डॉ. ऋषिकेश पंड्या | प्रॉस्टेट् ग्लॅन्डकी निगरानी |
| १७ फेब्रु ०७ | श्री. दा.कृ.सोमण<br>(सुप्रसिध्द खगोल अभ्यासक) | पुढच्या शतकातील शोध<br>व आकाशदर्शन |

# 'ओझोन'च्या आजीव सभासदांसाठी वर्षभरात आयोजित केलेले कार्यक्रम

## दिवाळी पहाट

ओझोनच्या आजीव समासदांसाठी दिवाळीच्या निमित्ताने २१ ऑक्टोबर रोजी दिवाळी पहाटचे खास आयोजन करण्यात आले होते. दिवाळी पहाटमध्ये तुझं माझं जीवनगाणं ही सुरेल मैफिल शेकडो रसिकांच्या उपस्थित गाजली. सौ.गीता कदम यांनी या मैफिलीची निर्मिती केली होती, तर जीवन शेट्ये, चंद्रकांत कदम, अविनाश पळणीतकर, सौ.विलेखा विरकर-देवस्थळी, आरती गोसावी व लता नायडु या कलाकारांनी आपले सुरेल गायन सादर केले. पहाटे रंगलेल्या या मैफिलीचे अतिशय शानदार सुत्रसंचालन संतोष जाधव यांनी केले. मैफिलीस उपस्थितांना दिवाळीनिमित्त खास फराळ दिला गेला.

## ख्रिसमस कार्यक्रम

ख्रिसमस च्या निमित्ताने ओझोन च्या समासदांसाठी अतिशय शानदार कार्यक्रम सादर करण्यात आला.

## हिंदी हास्य कवी संम्मेलन

ओझोनच्या समासदांसाठी यंदा प्रथमच हिंदी हास्य कवी संम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम ओझोन च्या प्रांगणात २५ फेब्रुवारी २००७ रोजी साजरा करण्यात आला. या कवी संम्मेलनात प्रसिध्द कवी युवराज जैन, देवल पंड्या, नितिन देसाई, महेश दुबे, विनु महेंद्र, गौरव शर्मा व नरेंद्र बंजारा यांनी आपल्या कविता सादर करुन रसिकांचे मनोरंजन केले.

# ऋणनिर्देश

संस्थेच्या आजवरच्या वाटचालीत अनेक मान्यवर व्यक्ती, संस्था, पत्रकार, क्रीडासमीक्षक त्याचप्रमाणे संस्थेच्या सभासदांचे व अनेक कार्यकर्त्यांचे सतत सक्रीय व आर्थिक पाठबळ लाभले. त्याचप्रमाणे त्यांचा संस्थेवरील लोभ सतत वृद्धिंगतच होत गेला, त्यांच्या सहकार्यामुळेच आज संस्थेने यशस्वीरित्या विविध उपक्रमांमध्ये वाटचाल केली. सेवाभावीवृत्तीने काम करणाऱ्या सेवक वर्गाचेही संस्थेच्या वाटचालीत महत्त्वाचे सक्रीय योगदान आहे.

प्रबोधन गोरेगाव संस्थेच्या जॉगर्स पार्क येथील टेनीस कोर्टचे आधुनिक पद्धतीचे कोटींग तसेच जॉगींग ट्रॅकवर पेवर बॉल्क सौदर्यीकरण आणि प्रबोधन क्रीडाभवन येथे रेनवॉटर हार्वेस्टींग हे प्रकल्प गोरेगावचे आमदार शिवसेना नेते आणि प्रबोधनचे संस्थापक मा. सुभाष देसाई यांच्या स्थानिक विभाग निधितून करण्यात आले असून या तीनही प्रकलपांसाठी सुमारे २१ लक्ष रुपयांचा निधी खर्च झालेला आहे. प्रबोधन संस्थेस दिलेल्या या विकासकामांच्या सहकार्याबदल प्रबोधन गोरेगाव संस्था मा. सुभाष देसाई सांची शतशः ऋणी आहे.

संस्थेस सतत आर्थिक पाठबळ देणारे देणगीदार, दानशूर व्यक्ती व संस्था त्याचप्रमाणे गोरेगावचे आमदार, नगरसेवक व महानगरपालिका प्रशासन या सर्वांची संस्था अत्यंत ऋणी आहे. त्या सर्वांबरोबरचे ऋणानुबंध व प्रेम सतत वृद्धिंगतच होत राहील, याचा आम्हास मनापासून विश्वास वाटतो.

कार्यकारी मंडळ

प्रबोधन गोरेगाव

# २९ व्या क्रीडामहोत्सवाचा निकाल (परिशिष्ट - अ)

प्रबोधन मानचिन्ह (सर्वोत्कृष्ट संघ) :
मानचिन्ह पुरस्कर्ते - श्री. सुरेश वासुदेव सैतवडेकर
कै. वासुदेव कृष्णाजी सैतवडेकर स्मृतिचिन्ह,
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर वांद्रे (पूर्व).

ॲथलेटिक्स स्पर्धा विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. विनोद निंबाळकर
कै. शशिकला सखाराम निंबाळकर स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : गोकुळधाम हायस्कूल, गोरेगाव (पूर्व).

ॲथलेटिक्स स्पर्धा उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.एस.एन.बाळकृष्ण
कै.एस.एन.सुब्रमणियन् स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : विद्यामंदीर, दहिसर

कबड्डी मुले विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश टिंबर मार्ट
कै. आसाराम गायकवाड स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : नंदादीप विद्यालय, गोरेगाव (पूर्व)

कबड्डी मुले उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश एक्सपोर्ट, गोरेगाव.
शाळा : वि.वि. देऊलकर हायस्कूल, जोगेश्वरी (पूर्व)

कबड्डी मुली विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मे. जे.बी.सावंत इंजिनिअरिंग प्रा.लि.
शाळा : महात्मा गांधी विद्यालय, बांद्रा (पूर्व)

कबड्डी मुली उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश प्लास्टिक वर्क्स
शाळा : नंदादीप विद्यालय, गोरेगाव (पूर्व)

लॉन टेनिस स्पर्धा विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.व सौ. रामाराव
कै. त्रिशांक रामाराव स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : हंसराज मोरारजी पब्लिक स्कूल, अंधेरी (प.)

लॉन टेनिस स्पर्धा उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. व सौ. रामाराव
कै. त्रिशांक रामाराव स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : डिव्हाईन चाईल्ड हायस्कूल, अंधेरी (पूर्व)

जलतरण स्पर्धा विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. नितिन शिंदे
सौ. विजयालक्ष्मी अनंतराव शिंदे स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : यशोधाम हायस्कूल, गोरेगाव (पूर्व).

खो-खो मुले विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : आर.एस.जंगम
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदीर, बांद्रा (पूर्व)

खो-खो मुले उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मे. तुलसीदास खिमजी वेअर हाऊसिंग कं.
कै. तुलसीदास खिमजी स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : परांजपे विद्यालय, अंधेरी

खो-खो मुली विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : कै. एन.बी.पाटील,
कै. मंदार पाटील स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : परांजपे विद्यालय, अंधेरी.

खो-खो मुली उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : सौ. आशा प्रभाकर ठाकूर
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व).

संचलन स्पर्धा विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : कै. एन.बी.पाटील
कै. बाळकृष्ण पाटील स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : सेंट ॲनी हायस्कूल, बोरीवली (प)

संचलन स्पर्धा उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गोरेगाव स्पोर्टस् क्लब
शाळा : मेरी इमॅक्युलेट गर्ल्स हायस्कूल, बोरीवली (प.)

लोकनृत्य स्पर्धा विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स हॉटेल प्रकाश, गोरेगाव
शाळा : ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल, कांदिवली (पूर्व)

लोकनृत्य स्पर्धा उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आशीर्वाद स्टोर्स, गोरेगाव
शाळा :१) सेंट पॉल हायस्कूल, मालाड (प.)
२) चिल्ड्रन ॲकॅडमी, आशा नगर, कांदिवली

मल्लखांब स्पर्धा विजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. विनोद निंबाळकर
कै. सखाराम निंबाळकर स्मृतिप्रीत्यर्थ,
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदीर, बांद्रा (पूर्व)

मल्लखांब स्पर्धा उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. नितिन शिंदे,
कै. डॉ. अनंतराव शिंदे स्मृतिप्रीत्यर्थ
शाळा : बाल विकास विद्यामंदीर, जोगेश्वरी

जलतरण स्पर्धा उपविजेता संघ :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. विनोद निंबाळकर
कै. शशिकला सखाराम निंबाळकर स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : आर्य विद्यामंदिर, सांताक्रूझ.

उत्कृष्ट ॲथलेटिक्स (मुलगी)
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आयडियल क्लासेस प्रा. लि.
कु. रूचिका घाग, मेरी इमॅक्युलेट हायस्कूल, बोरीवली (प.)

उत्कृष्ट ॲथलेटिक्स (मुलगा)
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आयडियल क्लासेस प्रा.लि.
कु. करण कांचन, माणिकजी कुपर स्कूल, जुहू.

## ३३ व्या वक्तृत्वस्पर्धेचा निकाल (परिशिष्ट - ब)

शालेय गट :
कै. बापूसाहेब रेगे स्मृति प्रबोधन फिरते मानचिन्ह
विजेता संघ : सी.डी.ओ.मेरी हायस्कूल, नाशिक

घोषित विषय :
प्रथम क्रमांक (रोख रू. १५००/- व प्रशस्तीपत्र)
सपना महादेव म्हेत्रे, सुयश विद्यालय, सोलापूर
द्वितीय क्रमांक (रोख रू. १२५०/- व प्रशस्तीपत्र)
अनघा अतुल भगरे, सी.डी.ओ.मेरी हायस्कूल, नाशिक
तृतीय क्रमांक (रोख रू. १०००/- व प्रशस्तीपत्र)
वैभवी सुहास शिर्के, शैलेंद्र एज्युकेशन माध्य. विद्यालय, दहीसर

उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रे :
सुकृत मनोहर साने, सरस्वती सेकंडरी स्कूल, ठाणे
गायत्री प्रदीप गोखले, सन्मित्र विद्यामंदिर, गोरेगाव
प्राजक्ता दीपक काठे, माधवराव भागवत हायस्कूल, विलेपार्ले.

उत्स्फूर्त विषय -
प्रथम क्रमांक (रोख रू. १५००/- व प्रशस्तीपत्र)
प्राजक्ता सुरेंद्र भिडे, सरस्वती सेकंडरी स्कूल, ठाणे.
द्वितीय क्रमांक (रोख रू. १२५०/- व प्रशस्तीपत्र)
अमोल वसंत मोरे, अरविंद गंडभीर हायस्कूल, जोगेश्वरी
तृतीय क्रमांक (रोख रू. १०००/- व प्रशस्तीपत्र)
पूर्वा अशोक कुलकर्णी, सी.डी.ओ.मेरी हायस्कूल, नाशिक
उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रे :
मृण्मयी मिलिंद केणेकर, टिळकनगर विद्यामंदिर, डोंबिवली

महाविद्यालयीन गट :
कै. गोविंदराव कुलकर्णी स्मृति प्रबोधन फिरते मानचिन्ह
विजेता संघ : रामनारायण रूईया महाविद्यालय, माटुंगा.

घोषित विषय :
प्रथम क्रमांक (रोख रू. १५००/- व प्रशस्तीपत्र)
राजेंद्र बाजीराव चव्हाण, चेंबूर सर्व कष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चेंबूर
द्वितीय क्रमांक (रोख रू. १२५०/- व प्रशस्तीपत्र)
विक्रम नरेंद्र वालावलकर, रामनारायण रुईया महाविद्यालय, माटुंगा
तृतीय क्रमांक (रोख रू. १०००/- व प्रशस्तीपत्र)
विजय आनंद कदम, पाटकर महाविद्यालय, गोरेगाव.

उत्तेजनार्थ प्रशस्तिपत्रे :
निकिती अशोक लहाने, डी. जी. रूपारेल महाविद्यालय, माटुंगा
स्वप्निल हेमंत पाठक, एच.पी.टी. / आर. वाय. के. कॉलेज, नाशिक

उत्स्फूर्त विषय -
प्रथम क्रमांक (रोख रू. १५००/- व प्रशस्तीपत्र)
नचिकेत जयवंत कुलकर्णी, रामनारायण रूईया महाविद्यालय, माटुंगा
द्वितीय क्रमांक (रोख रू. १२५०/- व प्रशस्तीपत्र)
प्रिती गावडे, पाटकर महाविद्यालय, गोरेगाव

## प्रबोधनकार ठाकरे वाचनालय

(२००६ - २००७)

| | | | |
|---|---|---|---|
| मराठी - | ४९८३ | इंग्रजी - | ८४४ |
| हिंदी - | ३३२ | संदर्भ ग्रंथ - | ४१९ |
| | | एकूण पुस्तके - | ६५७८ |

| मासिके - | पाक्षिके |
|---|---|
| इंग्रजी - सोसायटी, सॅवि, स्टारडस्ट, फिल्मफेअर, न्यु वुमन, हेल्थ | इंग्रजी - वुमन्स ईरा, फेमिना |
| मराठी - चारचौघी, गृहशोभिका, ललित, अनुभव, माहेर, स्त्री, किर्लोस्कर, मैत्रिण, मिळून साऱ्याजणी, भटकंती, गृहलक्ष्मी, मानिनी,प्रपंच, | मराठी - जनप्रवाह, श्री तशी सौ |
| हिंदी - गृहशोभा, मेरी सहेली, गृहलक्ष्मी, वनिता, नवनीत. | हिंदी - सरिता |
| एकूण - २४ | एकूण - ५ |
| **साप्ताहिक** | **वर्तमानपत्रे** |
| मराठी - चित्रलेखा, लोकप्रभा, साप्ताहिक सकाळ, मार्मिक | मराठी - सामना, महाराष्ट्र टाईम्स, नवाकाळ लोकसत्ता, सकाळ |
| इंग्रजी - आऊट लुक, द विक, इंडिया टूडे | इंग्रजी - टाईम्स ऑफ इंडिया |
| एकूण - ७ | एकूण - ६ |

**बालविभाग**

| | | |
|---|---|---|
| मराठी | - | ५७३ |
| इंग्रजी | - | ७२२ |
| हिंदी | - | १४७ |
| एकूण (२००६) | - | १४४२ |
| खरेदी केलेले ग्रंथ | - | १४६ |
| भेट आलेले ग्रंथ | - | ३७ |
| एकूण पुस्तके (२००७) | - | १६२५ |

३१ मार्च २००६ अखेरीस एकूण सभासद - ९९६

नवीन सभासद - १०४

रद्द सभासद - ११२

३१ मार्च २००७ अखेरीस एकूण सभासद - ९८८

ज्ञान-कला-सेवा यांचा त्रिवेणी संगम

# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिद्धार्थ नगर,
गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ दूरध्वनी : २८७९ ७५ ८०/८१
www.prabodhan.org

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेले

## प्रबोधन क्रीडाभवन

या सर्वांगसुंदर क्रीडासंकुलामध्ये क्रिकेट, जिम्नॅस्टिक्स,
ॲथलेटिक्स, टेबलटेनिस, योग, खो-खो, कराटे व नृत्य यांचे तज्ज्ञांकडून
प्रशिक्षण उपलब्ध तसेच सुसज्ज व्यायामशाळा, हेल्थसेंटर

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहकार्यातून साकार झालेले

## प्रबोधन जॉगर्स पार्क

टेनिस प्रशिक्षणाची आणि सरावाची सुविधा असलेली टेनिस ॲकॅडेमी
आणि सभोवताली सुंदर वनराई असलेला जॉगिंग ट्रॅक

मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्याने परिपूर्ण

## प्रबोधनकार ठाकरे वाचनालय

प्रत्येक घरासाठी, घरातील प्रत्येकासाठी उत्तमोत्तम पुस्तके
आणि बाळगोपाळांसाठी ज्ञान-मनोरंजनाचा मेवा

प्रबोधन जॉगर्स पार्क : सिद्धार्थ नगर, रस्ता क्र. १७, गोरेगाव (प.), मुंबई ४०००६२. दूरध्वनी : २८७५७५ ८८.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेली

## माँ साहेब सौ. मीनाताई ठाकरे प्रबोधन रक्तपेढी

२४ तास कार्यरत असलेल्या या रक्तपेढीत
अल्पदरात रक्त व रक्तघटक उपलब्ध.

सिद्धार्थ रूग्णालय, गोरेगाव (प.), मुंबई-४०० १०४. दूरध्वनी क्र. २८७२ २९ २९ / २८७९ ७५ ८६/८७.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेला

## ओझोन जलतरण तलाव

'ओझोन' प्रक्रियेचा वापर केलेल्या जलतरण तलावात
तज्ज्ञांकडून पोहण्याचे प्रशिक्षण माफक दरात उपलब्ध.

निरलॉन ऑलिम्पिक जलतरण तलाव, सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४. दूरध्वनी क्र. २८७९७५८२/८३